महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शुक्रवार ■ 14 फेब्रुवारी 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 230 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# ठाकरे गटाला धक्का!

## राजन साळवी शिवसेनेत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : आज माझ्या दोन्ही डोळयांमध्ये अश्रू आहेत. एकामध्ये दुःखाश्रू आहेत. गेल्या ३८ वर्ष शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने शिवसेनेचे काम करत असताना नगरसेवक, नगराध्यक्ष, जिल्हाप्रमुख आणि २००९ ते २०१९ मध्ये आमदार होऊ शकलो आणि त्यानंतर शिवसेना उपनेता झालो. सर्वसामयान्य कुटुंबातील सदस्य इतक्या मोठ्या पदावर पोहचलो तो पक्ष आज मला मागे सोडून नव्या प्रवाहात यावे लागत आहे, याबाबत मला दु:ख आहे असे माजी आमदार राजन साळवी म्हणाले. राजापूरचे माजी आमदार राजन साळवी यांनी गुरुवारी दुपारी ठाण्यातील आनंद आश्रमामध्ये शिवसेनेत (शिंदे



गट) प्रवेश केला. त्यावेळी राजन साळवी माध्यमांसमोर बोलत होते. साळवी म्हणाले की, ९ फेब्रुवारीला भाईंना (एकनाथ शिंदे) भेटून कुटुंबातील सदस्य येऊ इच्छित असल्याची इच्छा व्यक्त केली होती. शिवसेना प्रमुखांच्या आशिर्वादाने २००० साली जिल्हाप्रमुख झालो. त्यावेळी याच ठिकाणी माझा दिवंगत आनंद दिघे यांनी सत्कार झाला होता. आज, अनेक वर्षानंतर एकनाथ शिंदे यांच्या हस्ते माझा सन्मान होत आहे. आज माझ्या दोन्ही डोळयांमध्ये अश्रू आहेत. एकामध्ये दुःखाश्रू आहेत. गेल्या ३८ वर्ष शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशिर्वादाने शिवसेनेचे काम करत असताना नगरसेवक, नगराध्यक्ष, जिल्हाप्रमुख आणि २००९ ते २०१९ मध्ये आमदार होऊ शकलो आणि त्यानंतर शिवसेना उपनेता झालो. सर्वसामयान्य कुटुंबातील सदस्य इतक्या मोठ्या पदावर पोहचलो तो पक्ष आज मला मागे टाकून सोडून नव्या प्रवाहात यावे लागत आहे, याबाबत मला दु:ख आहे असे माजी आमदार राजन साळवी म्हणाले. तर, दुसऱ्या डोळयात आनंदाश्रू आहेत. कुटुंबातील सदस्य म्हणून एकनाथ शिंदे यांनी माझ्यावर प्रेम केले आहे असेही स्पष्टीकरण त्यांनी दिले. मला शिवसेना पक्षाकडून सर्वकाही मिळाले आहे. मी समाधानी आहे. परंतु भविष्यात काळखंडात संघटना वाढविणे मोठे होईल. माझ्या सोबत आलेल्या शिवसैनिकांना योग्य सन्मान दिला जावा अशी अपेक्षा असल्याचेही साळवी म्हणाले.

### विनायक राऊतांवर ठपका

अडीच वर्षांपूर्वी एकनाथ शिंदे यांच्यासोबत जाऊ शकलो नव्हतो. त्याचे मला दुःख आहे. २०२४ च्या निवडणूकीत मला पराभवाला सामोरे जावे लागले. २०१४ झाली युतीची सत्ता आली. त्यावेळी मंत्री होईल असे वाटले होते. त्यावेळी एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांच्याकडे माझी शिफारस केली होती. परंतु मी मंत्री होऊ शकलो नाही. शिवसेनेचे नेते विनायक राऊत यांनी त्यावेळी दिपक केसरकर यांना मंत्री केले. २०१९ च्या निवडणूकीत मी पुन्हा मंत्री होईल असे वाटले होते. त्यावेळी उदय सामंत मंत्री झाले. २०२४ च्या निवडणूकीत सत्तापरिवर्तन होऊन महाविकास आघाडीची सत्ता येणार असे वाटले होते. पण नियतीच्या मनात वेगळे होते. २०२४ पराभव माझ्या जिव्हारी लागला आहे. सिंधूदुर्ग जिल्ह्यात विनायक राऊत यांना आम्ही खासदार केले. त्याच विनायक राऊत यांनी किरण सामंत यांचे काम केले असा आरोप देखील त्यांनी राऊत यांच्यावर केला.

# काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदी हर्षवर्धन सपकाळ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



काँग्रेसच्या नवीन प्रदेशाध्यक्षपदी हर्षवर्धन सपकाळ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. एबीपी माझाच्या बातमीवर शिक्कामोर्तब झाला आहे. हर्षवर्धन सपकाळ हे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष होण्याची शक्यता असल्याचे वृत्त एबीपी माझाने दिले होते. त्यानुसार आज त्यांची नियुक्ती झाल्याचे पत्र प्रसिद्ध झाले आहे. गेल्या अनेक दिवसांपासून काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांना बदलाच्या चर्चा सुरु होत्या. अखेर आज नाना पटोले यांच्याकडील काँग्रेस प्रदेशाध्यक्ष पद हे हर्षवर्धन सपकाळ यांना गेले आहे. हर्षवर्धन सपकाळ हे काँग्रेसचे निष्ठावान कार्यकर्ते आहेत. तसेच गांधी परिवाराचे अत्यंत जवळचे सहकारी ते मानले जातात. दरम्यान, काँग्रेस प्रदेशाध्य पदाच्या शर्यतीत अनेक नावे होती. यामध्ये कोल्हापूरचे सतेज पाटील, लातूरचे अमित देशमुख, सांगलीचे विश्वजित कदम यांची नावे देखील होती. मात्र, अखेर हर्षवर्धन सपकाळ यांच्याच गळया प्रदेशाध्यक्ष पदाची माळ पडली आहे. जाणून घेऊयात हर्षवर्धन सपकाळ यांची राजकीय कारकिर्द.

# ठाणे जिल्ह्यात बनावट मद्याचे कारखाने उध्दवस्त

## १९ लाखाच्या मद्यासह तीन जण अटकेत



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण – ठाणे जिल्ह्यातील कल्याण विभागातील राज्य भरारी पथक क्रमांक दोनच्या भरारी पथकाने बुधवारी शहापूर तालुक्यातील नडगाव, कर्जत तालुक्यातील मौजे मोग्रज येथे छापे टाकून विदेशी मद्याचे कारखाने उद्ध्वस्त केले. दमण, गोवा येथून मद्याचा साठा आणून त्या मद्यामध्ये भेसळ करून या मद्याच्या बाटल्यांना विदेशी महागड्या मद्याच्या बाटल्यांची बुचे लावून हे मद्य महाराष्ट्राच्या विविध भागात विकले जात असल्याचे भरारी पथकाच्या निदर्शनास आले आहे. भरारी पथकाने या बनावट विदेशी मद्याची निर्मिती करणाऱ्या श्रीकांत देविदास टर्ले, किशोर गजानन पाटील, प्रदीप तुकाराम बामणे यांना अटक केली आहे. त्यांच्याकडून १८ लाख ८१ हजार रूपयांचा विदेशी मद्याचा बनावट साठा जप्त केला.

## थोडक्यात महत्वाचे

### उल्हासनगरमध्ये रेबीज लसीचा तुटवडा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर, ता. १३ (वार्ताहर) वर्षभरात तब्बल २१ हजार जणांना श्वानदंश झाल्याची नोंद उल्हासनगरातील शासकीय मध्यवर्ती रुग्णालयात झालेली आहे; मात्र तरीदेखील रेबीज इंजेक्शनचा तुटवडा असल्याने जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. मनोहर बनसोडे यांनी महापालिकेला नऊ पत्रे पाठवून इंजेक्शन मिळण्यासाठी मागणी केली आहे. २० व्या पशू जनगणनेनुसार शहरात भटक्या, पिसाळलेल्या श्वानांची संख्या १६ हजारांच्या वर आहे; मात्र ही आकडेवारी अनेक पटीने वाढण्याची शक्यता आहे. गेल्या दोन ते तीन वर्षांपासून श्वानदंशाच्या घटनेत कमालीची वाढ झालेली आहे. त्यात शालेय विद्यार्थी ते वयोवृद्ध नागरिक श्वानदंशाचे शिकार झालेले आहेत.

शासकीय मध्यवर्ती रुग्णालय हे इंजेक्शन देण्याचे मुख्य केंद्र आहे. या ठिकाणी आजूबाजूच्या शहरातील श्वानदंशाचे रुग्ण येत असतात. सोमवारी (ता. १०) या एकाच दिवशी श्वानदंशाचे १३५ रुग्ण रुग्णालयात आले होते. तेव्हा हा प्रकार अधिकच ऐरणीवर आला. या वेळी रेबीज इंजेक्शनचा तुटवडा असल्याची कबुली जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. मनोहर बनसोडे यांनी पत्रकारांशी बोलताना दिली. दररोज सरासरी १५० श्वान दंशाचे रुग्ण हे उपचारासाठी शासकीय रुग्णालयात येत असतात. वर्षभरात हा आकडा तब्बल २१ हजारांच्या वर आहे; मात्र तेवढ्या प्रमाणात इंजेक्शन उपलब्ध नसल्याने प्रशासन हतबल झाले आहे. महापालिका आयुक्तांनी यासाठी मदत करावी म्हणून नऊ पत्रे पाठवली आहेत; मात्र या पत्रांचे कोणतेही उत्तर वा प्रतिसाद मिळाला नसल्याची माहिती डॉ. मनोहर बनसोडे यांनी दिली.

### महिला व बालविकास विभागात मेगा भरती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

महिला व बालविकास विभागात मेगा भरती करण्यात येणार आहे.. विविध रिक्त पदांची भरती करण्याबाबत आज मंत्रालयातील दालनात बैठक घेण्यात आली..शासनाने विविध विभागात 70 हजार पदांची भरती करण्याचा निर्णय घेतलाय... महिला व बालविकास विभागांतर्गत एकात्मिक बालविकास सेवा योजनेअंतर्गत तब्बल 18 हजार 882 पदांची भरती करण्यात येणार आहे. ही भरतीप्रक्रिया 14 फेब्रुवारीपासून सुरु होत आहे. अंगणवाडी सेविकेत 5 हजार 639 तर मदतनीस विभागात 13 हजार 243 अशी एकूण 18 हजार 882 पदे भरण्यात येणार आहे.

### मुंबईत १४० कोटींची जीएसटी चोरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबईत 140 कोटींची GSTचोरी झाल्याचं उघडकीस आलंय.. बनावट GST देयकांच्या आधारे ही चोरी सुरु होती.. या प्रकरणी मिरा रोड येथून कपाडिया मोहम्मद सुल्तान या आरोपीला अटक करण्यात आलीये.. या प्रकरणी सुरुवातीला 26.92 कोटी रुपयांची चोरी समोर आली होती. त्यासंबंधी अधिक तपास केला असता मुख्य आरोपी सुल्तान हा 18 बनावट कंपन्यांच्या नावे देयके तयार करुन GSTचा परतावा घेत असल्याचे दिसून आले. अशा बनावट परताव्यांचा आकडा 140 कोटी रुपये होता. या घोटाळयासाठी सुल्तानने आधार कार्ड, पॅनकार्डसह अन्य दस्तावेजांचा गैरवापर केला होता. हे कार्ड विविध व्यक्तींच्या नावे होते. त्यांच्या नावे बनावट कंपन्या उघडून जीएसटीचा परतावा स्वतःच्या खात्यात घेतला जात होता.. त्याला कोर्टात हजर केलं असता कोर्टानं 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावलीये..

# संघटन पर्व बळकटीकरण

## चंद्रशेखर बावनकुळेंचा महाराष्ट्र दौरा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नागपूर प्रतिनिधी - भाजपाच्या 'संघटन पर्व' अभियानाच्या निमित्ताने भाजपा प्रदेशाध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे हे १३ ते १५ फेब्रुवारी असे तीन दिवस महाराष्ट्र प्रवासावर आहेत. कार्यकारी अध्यक्ष रवींद्र चव्हाण या प्रवासात सोबत असणार असून, राज्यातील विविध मतदारसंघातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकीसह संवाद साधणार आहेत. राज्यातील ४७ संघटनात्मक जिल्ह्यातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या बैठकी व विभागीय कार्यशाळा यानिमित्ताने घेण्यात येणार आहेत. गुरुवारी, १३ फेब्रुवारी रोजी अकोला येथे हॉटेल सिटी स्पोर्ट्स येथे सकाळी १० वाजता कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांची बैठक. दुपारी ३ नागपूरच्या जगनाडे चौकातील हॉटेल रिजंटा येथे पूर्व विदर्भातील पदाधिकाऱ्यांची बैठक होईल. सायंकाळी ७ वाजता पश्चिम नागपुरात कृष्ण ग्रीन लॉन कार्यकर्ता व पदाधिकाऱ्यांशी संवाद साधणार आहेत. शुक्रवारी, १४ फेब्रुवारीला सकाळी १० वाजता नांदेड येथे भक्तिलॉन येथे बैठक घेतील. दुपारी ३ वाजता गुरु लॉन्स अँड फंगशन हॉल, छत्रपती संभाजी नगर येथे बैठक होणार आहे. शनिवार, १५ फेब्रुवारीला सकाळी १० वाजता जळगाव येथील छत्रपती संभाजीराजे नाट्यगृह येथे बैठक होणार असून, त्याच दिवशी दुपारी ३ वाजता नाशिक येथील लंडन पॅलेस हॉल येथे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक घेणार आहेत.

# भात खरेदी बंद?

## शहापुरातील शेतकरी त्रस्त

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

खर्डी, ता. १३ (बातमीदार): आदिवासी विकास महामंडळातर्फे आधारभूत योजनेअंतर्गत २०२४-२५ या वर्षी मंजूर केलेल्या भातखरेदी केंद्रांपैकी फक्त दोनच खरेदी केंद्रे सुरू आहेत. ३१ मार्च ही खरेदीची शेवटची तारीख आहे. त्यामुळे खरेदी केंद्रच जर बंद असेल, तर खरेदी कशी होणार? या चिंतेत शहापूर तालुक्यातील शेतकरी सापडला. त्यामुळे प्रहार जनशक्ती पक्षाचे तालुका अध्यक्ष वसंत पानसरे यांनी उपप्रादेशिक व्यवस्थापकांना आठ दिवसांच्या आत खरेदी केंद्र सुरू न केल्यास कार्यालयासमोर भजन आंदोलनाचा इशारा दिला आहे. राज्य सरकारच्या निर्णयानुसार डिसेंबर महिन्यात भातखरेदी होणे गरजेचे होते; मात्र आदिवासी विकास महामंडळाच्या भोंगळ कारभारामुळे शहापूर तालुक्यातील भातखरेदी केंद्र सुरू झालेले नाही. शेतकऱ्यांची नोंदणी करून दोन महिने झाले, तरीदेखील खरेदीसाठी मेसेज न आल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे. सोसायटीचे कर्ज, घरातील लग्नकार्य, जमिनीची मशागत कशी करायची, अशा आर्थिक अडचणीत शेतकरी सापडला आहे. शेतकऱ्यांच्या अडचणींची दखल घेत प्रहारने उपप्रादेशिक व्यवस्थापकांना निवेदन देत भातखरेदी लवकर सुरू न झाल्यास कार्यालयासमोर भजन आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. याबाबत आदिवासी विकास महामंडळाचे प्रादेशिक उपव्यवस्थापक सागर सोनवणे यांच्याशी संपर्क केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही. या वेळी प्रहार प्रवक्ते विनायक बोंद्रे, तालुका संघटक विजय हरणे, प्रवीण अंदाडे, युवा संघटक मयूर किरपण इत्यादी उपस्थित होते.

### प्रहारचा आंदोलनाचा इशारा

**भातखरेदी न झाल्याने शेतकरी अडचणीत आला आहे. येत्या आठ दिवसांनी तालुक्यातील भातखरेदी केंद्र सुरू करावे अन्यथा या आदिवासी विकास महामंडळाच्या झोपी गेलेल्या यंत्रणेला जागे करण्यासाठी भजन आंदोलन करण्यात येणार आहे.**

■ वसंतकुमार पानसरे, अध्यक्ष, प्रहार जनशक्ती पक्ष, शहापूर तालुका

# मुरबाड नगरपंचायत नगराध्यक्षपदी भाजपाचे संतोष चौधरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता



आमदार किसन कथोरेंनी दिल्या शुभेच्छा

मुरबाड -प्रतिनिधीकाही दिवस रिक्त असलेल्या मुरबाड नगरपंचायतच्या दहाव्या नगराध्यक्ष पदी संतोष (बाबू)दिलीप चौधरी यांची बिनविरोध आज निवड झाल्याची घोषणा निवडणूक (पिठासिन ) अधिकारी रोहितकुमार रजपूत व मुख्याधिकारी मनोज म्हसे यांनी केली. एका सामान्य कुटुंबातील तरूणाला आमदार किसन कथोरे यांनी प्रथम नगरसेवक व आता मुरबाड शहराचा प्रथम नागरिक केल्याबद्दल संतोष (बाबू) चौधरी यांनी आमदार किसन कथोरे यांच्या बद्दल कृतद्नता व्यक्त करून आभार मानले आहेत.तर स्विकृत माजी नगरसेवक संतोष कोळेकर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने आकस्मित निधन झाले असल्याने मुरबाड शहरावर शोककळा पसरली असल्याने चौधरी यांनी कोणतीही मिरवणूक तथा गाजावाजा न करता शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळयाला व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण करून आपल्या हितचिंतकांच्या, नागरिकांच्या व कुटुंबियांच्या शुभेच्छा स्वीकारल्या. तसेच दिवंगत संतोष कोळेकर यांना नवनिर्वाचित नगराध्यक्ष चौधरी व सर्व नगरसेवक यांनी नगरपंचायत कार्यालया समोर भावपुर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. नवनिर्वाचित नगराध्यक्ष संतोष चौधरी यांचे मुरबाड विधानसभेचे आमदार किसन कथोरे यांनी पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तर चौधरी यांनी सर्व मुरबाडकरांचे, प्रभाग क्रमांक 13 मधील नागरिकांचे , तसेच सर्व माजी नगराध्यक्ष, सर्व नगरसेवक, नगरसेविका यांचे आभार मानले.

# ठाणे जिल्हा परिषदेकडून जल स्त्रोतांची तपासणी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे : राज्यातील गुइलेन बॅरे सिंड्रोम (जीबीएस) विषाणूंचा तसेच अन्य साथीच्या रोगांचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन ठाणे जिल्हा परिषदेने खबरदारीचा उपाय म्हणून गावांमध्ये होणाऱ्या पाणी पुरवठ्याचे नमुने तपासण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार, ठाणे ग्रामीणमधील ५ हजार ४३० जल स्त्रोतांतील पाण्याची तपासणी करण्यात येणार आहे. गावातील प्रशिक्षित महिला स्वयंसेवका घरांमध्ये येणाऱ्या पाण्याचे नमुने गोळा करून त्याची ग्रामपंचायत स्तरावर जैविक क्षेत्रीय तपासणी संचाद्वारे तपासणी करीत असून अशी तपासणी महिन्यातून एकदा केली जाणार आहे.**

जीबीएस विषाणूचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेऊन शुद्ध पाणी पुरवठा होण्याकरिता गाव पातळीवर नळ पाणीपुरवठा योजनांच्या स्रोताद्वारे शाळा, अंगणवाडी आणि नळाद्वारे घरामध्ये उपलब्ध होणारे पाणी यांची जैविक तपासणी केली जाणार आहे. यासाठी पाण्याचे नमुने गोळा करून जवळच्या भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेच्या प्रयोगशाळेमध्ये जमा केले जात आहे. तिथे या पाण्याची तपासणी करण्यात येत आहे. ग्रामीण भागातील घरगुती आणि सार्वजनिक स्रोत २ हजार ३६५, ग्रामपंचायत कार्यालय ४३१, शाळा १ हजार २६९, अंगणवाडी केंद्र १ हजार १५२, आरोग्य केंद्र ३३, उपकेंद्र १८० असे एकूण ५ हजार ४३० जल स्त्रोतांची तपासणी करण्यात येत आहे. जीबीएस विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत पाण्याचे निर्जंतुकीकरणही केले जाणार आहे. ठाणे ग्रामीण भागात घरगुती नळ जोडणीद्वारे प्रति व्यक्तीला किमान ५५ लिटर गुणवत्तापूर्वक शुद्ध पाणी प्रतिदिन पुरवठा करणे आवश्यक आहे. त्यानुसार, जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण भागातील जनतेला घरगुती आणि सार्वजनिक स्रोत, ग्रामपंचायत कार्यालय, शाळा, अंगणवाडी केंद्र, आरोग्य केंद्र, उपकेंद्रांना गुणवत्तापूर्वक शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे, हे महत्त्वपूर्ण उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात कामकाज सुरू करण्यात आले आहे. ग्रामीण जनतेला गुणवत्तापूर्ण पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी राज्यात पाणी गुणवत्ता सह नियंत्रण व सर्वेक्षण कार्यक्रम ग्रामीण भागात गावागावात राबविण्यात यावा. याद्वारे गावातील सर्व पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची आणि घरगुती नळ कनेक्शन द्वारे पुरवठा करण्यात येणाऱ्या पाण्याची (किमान दोन नमुने) रासायनिक तपासणी वर्षातून एकदा आणि जैविक तपासणी वर्षातून दोनदा प्रयोगशाळेत जमा करण्यात यावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व प्रकल्प संचालक जलजीवन मिशन प्रमोद काळे यांनी केले आहे.

# गीतासार



यः सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम् ।
नाभिनन्दति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥२- ५७॥

जो पुरुष सर्व बाबतीत स्नेहशून्य असून त्या त्या शुभ किंवा अशुभ गोष्टी घडल्या असता प्रसन्नही होत नाही किंवा त्यांचा द्वेषही करीत नाही, त्याची बुद्धी स्थिर असते. ॥ २-५७ ॥

यदा संहरते चायं कूर्मोऽङ्गानीव सर्वशः ।
इन्द्रियाणीन्द्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥२- ५८॥

कासव सर्व बाजूंनी आपले अवयव जसे आत ओढून धरते, त्याचप्रमाणे जेव्हा हा पुरुष इंद्रियांच्या विषयांपासून इंद्रियांना सर्व प्रकारे आवरून घेतो, तेव्हा त्याची बुद्धी स्थिर झाली, असे समजावे. ॥ २-५८ ॥

विषया विनिवर्तन्ते निराहारस्य देहिनः ।
रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते ॥२- ५९॥

इंद्रियांनी विषयांचे सेवन न करणाऱ्या पुरुषाचेही केवळ विषयच दूर होतात; परंतु त्यांच्याविषयीची आवड नाहीशी होत नाही. या स्थितप्रज्ञ पुरुषाची तर आसक्तीही परमात्म्याच्या साक्षात्काराने नाहीशी होते. ॥ २-५९ ॥

यततो ह्यपि कौन्तेय पुरुषस्य विपश्चितः ।
इन्द्रियाणि प्रमाथीनि हरन्ति प्रसभं मनः ॥२- ६०॥

हे कुंतीपुत्र अर्जुना, आसक्ती नाहीशी न झाल्यामुळे ही क्षोभ उत्पन्न करणारी इंद्रिये प्रयत्न करीत असलेल्या बुद्धिमान पुरुषाच्या मनालाही जबरदस्तीने आपल्याकडे ओढून घेतात. ॥ २-६० ॥

## आरोग्य टिप्स

# काळ्या चण्याचे आरोग्यदायी फायदे

१. रक्तदाब नियंत्रण: काळ्या हरभऱ्यात पोटॅशियम असते, जे रक्तदाब नियंत्रित करण्यास मदत करते.

२. हृदयाचे आरोग्य: काळ्या हरभऱ्यात फायबर आणि मॅग्नेशियम असते, जे हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर असते.

३. वजन व्यवस्थापन: काळ्या हरभऱ्यात फायबर असते, ज्यामुळे पोट भरल्यासारखे वाटते आणि वजन व्यवस्थापनात मदत होते.

४. रक्तातील साखरेचे नियंत्रण: काळ्या हरभऱ्यात फायबर असते, जे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करते.

५. पचनक्रिया निरोगी ठेवते: काळ्या हरभऱ्यात फायबर असते, जे पचनक्रिया निरोगी ठेवते.

६. अशक्तपणा रोखण्यासाठी: काळ्या हरभरा मध्ये लोह असते, जे अशक्तपणा रोखण्यास मदत करते.

काळे चणे हे अत्यंत पौष्टिक आणि चविष्ट डाळ आहे, ज्यामध्ये प्रथिने, फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजे भरपूर असतात. या डाळी आपल्या आरोग्यासाठी अनेक फायदे देतात. आपल्या आहारात काळे चणे समाविष्ट करून, आपण आपल्या शरीराला आवश्यक पोषक तत्वे पुरवू शकतो आणि आपले आरोग्य सुधारू शकतो.

# सौंदर्याची खाण बॉलिवूडची शान मधुबाला

आज १४ फेब्रुवारी, बॉलिवूडची मरलीन मनरो, सौंदर्याची खाण, बॉलिवूडची शान, चित्रपट सृष्टीतीलच नव्हे तर भारतातील सर्वात सुंदर महिला असे जीचे वर्णन केले जाते त्या मधुबाला यांचा आज जन्मदिन. आज त्यांची ९२ वि जयंती. १४ फेब्रुवारी १९३३ रोजी दिल्लीच्या एका पश्तून कुटुंबात जन्मलेल्या मधुबाला यांचे मूळ नाव मुमताज बेगम जहाँ देहलवी. असे म्हणतात की मधुबाला यांच्या जन्मानंतर एका व्यक्तीने तिच्या बाबत असे भविष्य वर्तवले होते की ती तिच्या आयुष्यात खूप ख्याती मिळवेल. पैसा अडका, धन संपत्ती मिळवेल पण तिचे आयुष्य अतिशय दुःखी असेल. या भविष्यावर विश्वास ठेवून तिचे वडील तिला मुंबईला घेऊन आले. वयाच्या नवव्या वर्षी म्हणजे १९४२ साली मधुबाला यांनी बेबी मुमताज या नावाने चित्रपटात भूमिका करण्यास सुरुवात केली. बाबुराव पटेल आणि डॉ सुशीलाराणी पटेल या दाम्पत्याचा मधुबाला वर विशेष लोभ होता त्यांनीच तिला मधुबाला हे नाव दिले. बालवयातच चित्रपटात काम करू लागल्याने मधुबाला या शाळेत जाऊ शकल्या नाहीत त्यामुळे त्यांना इंग्रजी येत नसे मात्र उर्दू भाषा येत होती. चित्रपटात भूमिका करण्यास सुरवात केल्यावर मात्र तिने इंग्रजीवर चांगले प्रभुत्व मिळवले. तिचे वडील कडक शिस्तीचे असल्याने ती कधीही चित्रपटाच्या प्रीमियरला उपस्थित राहत नसे. १९४७ साली आलेल्या निलकमल या चित्रपटात ती पहिल्यांदा अभिनेत्री म्हणून झळकली. याच वर्षी तिचा आणखी एक चित्रपट रिलीज झाला. पुढच्या वर्षी म्हणजे १९४८ साली तिचा अमर प्रेम नावाचा चित्रपट आला या सर्व चित्रपटात राज कपूर हे तिचे नायक होते. यानंतर बॉम्बे टॉकीजचा महल नावाचा चित्रपट आला हा चित्रपट सुपर डुपर हिट ठरला. यानंतर मात्र मधुबाला यांनी मागे वळून पाहिले नाही. अशोक कुमार, दिलीपकुमार, देवानंद या त्या काळातील आघाडीच्या अभिनेत्यांसह तिने भूमिका केल्या. अल्पावधीतच त्या बॉलिवूडच्या आघाडीच्या अभिनेत्री बनल्या. त्यांनी आपल्या करियरमध्ये ६६ चित्रपटात भूमिका केल्या. बॉलिवूडचे पहिले सुपरस्टार दिलीपकुमार यांच्यावर त्या एकतर्फी प्रेम करत असत. मुघले आझम चित्रपटाच्या शूटिंगच्या दरम्यान त्यांनी दिलीपकुमार यांच्याशी लग्न करण्याची इच्छा बोलून दाखवली मात्र दिलीपकुमार यांनी लग्नास स्पष्ट नकार दिला. त्यानंतर



त्यांनी गायक किशोरकुमार यांच्याशी विवाह केला. मधुबाला या किशोरकुमार यांच्या चौथ्या पत्नी होत्या. किशोरकुमार यांच्या बरोबरचे लग्न ही बाब दोघांसाठी कसेतरी जगण्यासाठी केलेली तडजोड होती त्यामुळेच दोघांचे जास्त पटत नसे. मधुबाला यांना हृदय रोग होता आणि १९५० पासून त्यांच्यावर उपचार चालू होते. पण तिने ही गोष्ट सर्वांपासून लपवून ठेवली होती. तिची तब्येत बरी नसतानाही त्यांनी निर्माते दिग्दर्शकांचे नुकसान होऊ नये म्हणून साइन केलेले चित्रपट पूर्ण केले. या चित्रपटात असे कोठेही जाणवत नव्हते की त्या आजारी आहेत. हृदय रोगासोबत त्यांना असा एक आजार होता की ज्या आजाराने शरीरात प्रमाणापेक्षा अधिक रक्त तयार होत असे व तिच्या नाकातून व तोंडातून रक्तस्त्राव होत असे. इतक्या दुर्धर आजारातही तिने चित्रपटात काम करणे सुरूच ठेवले. मुघले आझम या चित्रपटातील एका दृश्यात तिला दोरखंडाने बांधले होते पण तिने तब्येत बरी नसतानाही ते सहन केले. ती म्हणायची अनारकलीची भूमिका करण्याची संधी पुन्हा मिळणार नाही. ती इतकी प्रोफेशनल होती की आपले काम अतिशय तन्मयतेने करत असत. प्रसंगी जेवण झाले नाही तरी चालेल, थर्ड क्लासने प्रवास करावा लागला तरी चालेल पण काम वेळेच्या वेळी पूर्ण करण्याचा तिचा आग्रह असे. तिच्या याच कामाच्या निष्ठेमुळे ती महान अभिनेत्री बनली. अमेरिकेच्या थिएटर आर्टस या जगप्रसिद्ध मासिकेने तिचा जगातील सर्वात मोठी अभिनेत्री म्हणून गौरव केला होता. तिच्या सौंदर्याची जादूच अशी होती की बघणारा हरखून जायचा. पण हेच आरस्पानी सौंदर्य तिच्यासाठी मात्र शापित ठरले. वयाच्या अवघ्या ३६ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. २३ फेब्रुवारी १९६९ साली त्यांनी जगाचा निरोप घेतला. मधुबालाला व्हीनस ऑफ स्क्रीन असे म्हटले जाते मात्र तिच्या याच आरस्पानी सौंदर्याला अल्पायुष्याचा शाप होता. आज त्या जाऊन ५६ वर्ष झाले मात्र तिच्या सौंदर्याची आणि अभिनयाची जादू आजही कायम आहे. सौंदर्याची खाण बॉलिवूडची शान असलेल्या मधुबाला यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

- श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

# संत रवीदासांच्या कार्याचा प्रभाव साडेसहाशे वर्षानंतरही कायम

## - माजी आमदार नरेंद्र पवार



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : १६ व्या शतकातील भक्ती चळवळीचे भारतीय गूढ कवी-संत अशी ओळख असलेल्या संत शिरोमणी रवीदास महाराज यांच्या कार्याचा प्रभाव 648 वर्षानंतरही कायम असल्याचे उद्गार माजी आमदार नरेंद्र पवार यांनी काढले आहेत. संत शिरोमणी रवीदास सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या माध्यमातून कल्याणातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी माजी आमदार नरेंद्र पवार बोलत होते. यावेळी झालेल्या संत शिरोमणी रवीदास महाराज यांच्या जयंती कार्यक्रमाला कल्याण पूर्वेच्या आमदार सुलभा गायकवाड, कल्याणचे एसीपी कल्याणजी घेटे, भाजपा मंडल अध्यक्ष संजय मोरे, आयोजक आणि संस्थापक राम बनसोडे, अध्यक्ष भैरवनाथ वाघमारे, महिला अध्यक्षा मंगल गायकवाड, सचिव बाळासाहेब वाघमारे, खजिनदार गंजेंद्र राऊत, उपाध्यक्ष आबा कांबळे, कार्याध्यक्ष प्रकाश लांडगे, सहसचिव अमित उगले, माजी महिला अध्यक्षा कविता रूपवते, हनुमंत गायकवाड, प्रमोद जळगांवकर, मनोज वाघमारे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.संत शिरोमणी रवीदास महाराज यांनी आयुष्यभर आपल्या ईश्वरभक्तीच्या माध्यमातून तत्कालीन समाजातील असमानता, भेदभाव आणि अनिष्ट रूढी परंपरांवर बोट ठेवले. इतकेच नाही तर त्यांनी आपल्या श्लोक आणि भक्तीगीतांतून समाजाला जागृत करण्याचेही काम केले. संत शिरोमणी रवीदास महाराज यांनी आपल्या जीवनात सामाजिक समता, बंधुत्व आणि भक्तीचाही संदेश दिला. त्यांच्या रचनांमध्ये ईश्वरभक्ती, मानवतावाद आणि सामाजिक न्याय यांचा समावेश असून आज तब्बल 648 वर्षानंतरही संत शिरोमणी रवीदास महाराज यांच्या कार्याचा प्रभाव कायम असल्याचेही नरेंद्र पवार यांनी सांगितले.

यासोबतच माजी आमदार नरेंद्र पवार यांनी देशाच्या सुदृढ लोकशाहीमधील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि त्यांनी लिहिलेल्या भारतीय संविधानाचा आवर्जून उल्लेख केला. या संविधानाने आज देशातील गरिबात गरीब असो की कितीही श्रीमंत व्यक्ती, या दोघांनाही जगण्याचा समान अधिकार प्राप्त झाल्याची भावना अधोरेखित केली. दरम्यान यावेळी वैद्यकीय, शिक्षण, पत्रकारिता अशा विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या रोहिदास समाजाच्या कर्तृत्ववान व्यक्तींचा माजी आमदार नरेंद्र पवार यांच्या हस्ते सन्मानही करण्यात आला.

## मुख्यमंत्र्यांची लाडक्या बहिणींना ग्वाही

# आपली योजना कधीही बंद पडणार नाही

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई : "लाडकी बहीण योजना ही आमच्यासाठी केवळ आर्थिक मदत नाही, तर आमच्या जगण्याचा आधार आहे", असे धुणी भांडी करणाऱ्या महिलांनी सांगताच ही योजना कधीही बंद पडणार नाही! अशी आश्वासनपर ग्वाही मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिली. यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी येथील धुणी भांडी काम करणाऱ्या २० महिलांना रसिकाश्रय या संस्थाने "जीवाची मुंबई, श्रमाची आनंदवारी" या उपक्रमांतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची सह्याद्री अतिथीगृह येथे भेट घडविली. मुख्यमंत्र्यांसह झालेल्या भेटीदरम्यान अनेक महिलांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले. "भांडे घासून मिळणाऱ्या ५०० रुपयांत



कुटुंब कसं चालवायचं, याचा प्रश्न होता. पण 'लाडकी बहीण' योजनेने आम्हाला मोठा आधार मिळाला," असे म्हणताना एक वृद्ध महिलेचा गळा दाटून आला. मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या भावना समजून घेत "लाडकी बहीण योजना कधीही बंद होणार नाही, यापेक्षा अधिक मदत कशी करता येईल, याचाही विचार करतोय, असे आश्वासन दिले. या महिलांसाठी ही भेट केवळ योजनांविषयी नव्हती, तर जीवनभर लक्षात राहणारा अनुभव होता. "आम्ही कधी विमान पाहिले नव्हते, पण आता आम्ही त्यातून प्रवासही केला. गेल्या दोन दिवसांत आम्हाला स्वर्गासारखी अनुभूती मिळाली," असे एका महिलेने मुख्यमंत्र्यांना सांगितले. या भेटीत महिलांनी आणखी एक विनंती केली की, "सन्माननिधी म्हणून मिळणारे १० हजार रुपये दरवर्षी मिळावेत." यावर मुख्यमंत्र्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत "शासन पातळीवर या मागणीचा विचार करू, असे सांगितले. तसेच काही वृद्ध महिला 'लाडकी बहीण' योजनेसाठी पात्र नसल्याने त्यांना 'निराधार योजना' अंतर्गत मदत देण्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले. या भेटीचे आयोजन "रसिकाश्रय" संस्थेने केले होते. "या महिलांच्या संघर्षाची जाणीव करून दिल्याबद्दल संस्थेचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभिनंदन केले. राज्यातील गरीब जनतेचे जीवन सुसह्य करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले

# डोंबिवली घरडा सर्कल सुशोभीकरणाच्या नावाखाली कडुलिंबावर कुऱ्हाड

डोंबिवली : डोंबिवली शहराला जोडणारे रस्ते एमआयडीसीमधील घरडा सर्कल चौकात मिळतात. या चौकाचे सुशोभीकरण करण्याचे काम सुरू आहे. मात्र सुशोभीकरणासाठी चौकातील लहान-मोठ्या अन्य झाडांसह कडुलिंबाची अशरक्षः खांडोळी करण्यात आल्याने पर्यावरणप्रेमींनी संताप व्यक्त केला जात आहे.

या चौकाच्या मध्यावर सुशोभिकरण करण्यासाठी काही वर्षांपूर्वी फेज 1 मधील घरडा केमिकल्स लिमिटेड या कंपनीने पुढाकार घेतला. चौकातील मध्यावर कारंजे आणि पाण्याच्या धबधब्या शिवाय आजुबाजुला छोटी-मोठी झाडे लावून अतिशय सुंदर असे सुशोभीकरण केले होते. कालांतराने कंपनीने किंवा कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने देखभाल-दुरूस्तीकडे दुर्लक्ष केल्याने, तसेच सदर सुशोभीकरण केलेल्या चौकाभोवती नेत्या-पुढाऱ्यांच्या वाढदिवसा निमित्त त्यांना शुभेच्छा देणाऱ्या फलकांसह जाहिरातींचेही फलक लागत असतात. त्यामुळे या चौकाचे विद्रुपीकरण झाले होते.

सद्या या सर्कलचे पुन्हा सुशोभीकरण करून तेथे छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभा करण्याचे काम सुरू आहे. ही डोंबिवलीकरांसाठी अतिशय स्पृहणीय बाब आहे. परंतु तेथे आधी असलेली व अडसर न ठरणारी झाडे तोडणे चुकीचे असल्याचे मत डोंबिवली वेल्फेअर असोसिएशनचे सचिव राजू नलावडे यांनी व्यक्त केले आहे. बुधवार दुपारी याच सर्कलमधील कडुलिंबाच्या मोठ्या झाडासह अन्य छोटी झाडे सुशोभीकरण नावाखाली तोडण्यात आली.

# कर्करोग मोबाईल व्हॅन म्हारळ, वरप, कांबा मध्ये



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कर्करोगाविरुध्द लढा देऊ योग्य औषधोपचाराने निरोगी राहू, हया घोषणा घेऊन कालच राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लोकार्पण सोहळा पार पडलेल्या कर्करोग मोबाईल व्हॅन चे आज कल्याण तालुक्यातील म्हारळ, वरप, कांबा या परिसरात आगमन झाले, पहिल्याच दिवशी तब्बल११४रुग्णांच्या कर्करोगाच्या संदर्भात विविध तपासण्या करण्यात आल्या, यामध्ये दहागांव प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे योगदान व परिश्रम दिसून आले.कर्करोग देश,राज्यातून समूळ नष्ट करण्यासाठी शासन विविध प्रकारच्या उपाययोजना करत असते, कर्करोगामध्ये मुख कर्करोग, स्तन कर्करोग, गर्भाशयमुख कर्करोग, आदी प्रकार आहेत, यामुळे अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे, याकरिता शासनाच्या आरोग्य विभागाने कर्करोग मोबाईल व्हॅन आणली आहे, ही अद्यावत असून त्याचा लोकार्पण सोहळा९फेब्रुवारी रोजी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते नुकताच पार पडला, ही व्हॅन नुकतीच कल्याण तालुक्यातील म्हारळ, वरप, कांबा या परिसरात आली होती, व्हॅनमध्ये सिव्हिल हॉस्पिटलचे दंतरोग तज्ञ डॉ सुप्रिया महाजन, स्त्री रोग तज्ञ, डॉ लीना कुंभारे, हे होते. यावेळी परिसरातील ११४रुग्णांची तपासणी करण्यात आली, जे पेशंट संशयास्पद वाटतात, त्यांच्या पुढील तपासण्या ठाणे सिव्हिल हॉस्पिटल मध्ये करण्यात येणार आहे.याकरिता दहागांव प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या वैद्यकीय अधिकारी डॉ पूनम जयकर, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ रेणू त्रिलोकछंदांनी, कैलास तेलकोटे, योगिता जाधव, स्वराज आडसूल, राजश्री साबळे, सुनंदा गायकवाड, नमिता चौधरी, आणि या परिसरातील आशा यांनी मेहनत घेतली. लोकांच्या उस्फुर्त सहभागामुळे आरोग्य विभाग तसेच नागरिकांनी देखील समाधान व्यक्त केले आहे.

# जिल्हा परिषद शाळा राहनाळ येथे शिवचरित्र पारायण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र ऐकणे म्हणजे जीवन जगण्याला मोठी ऊर्जा मिळते. शिवरायांचे आचार, विचार, पराक्रम, रयतेवरील राजाचं प्रेम, युद्ध तंत्र, या सर्व गोष्टी आपल्याला प्रचंड ऊर्जा आणि आनंद देणाऱ्या आहेत त्यामुळे जिल्हा परिषद केंद्र शाळा राहनाळ येथे शिवचरित्र पारायण सुरू करण्यात आले आहे.

शाळेतील शिवचरित्र पारायणाचे हे चौथे वर्षे आहे. जिल्हा परिषद केंद्र शाळा राहनाळ येथे ३ फेब्रुवारी पासून शिवचरित्र पारायणाला सुरूवात झाली. शाळेचे मुख्याध्यापक अजय पाटील यांनी शिवजन्मापूर्वीचा महाराष्ट्र आणि संतांची कामगिरी, कथा विद्यार्थ्यांसमोर कथन करून या कार्यक्रमाची सुरूवात केली आहे तर शिक्षक अंकुश ठाकरे यांनी छत्रपती शिवरायांचा जन्म, प्रताप गडावरील पराक्रम, संध्या जगताप यांनी शिवरायांचे बालपण,





चित्रा पाटील यांनी स्वराज्याची शपथ, तर माया सोनकांबळे यांनी तोरणा किल्ला जिंकून स्वराज्याचे तोरण बांधले. ही कथा उत्कृष्टपणे सादर केले आहेत. स्वकीय शत्रूंचा बंदोबस्त, रसिका पाटील यांनी पन्हाळगडावरून विशालगडावर ही कथा मुलांना सांगितली.

या उपक्रमाची संकल्पना शाळेचे मुख्याध्यापक अजय पाटील यांची असून ३ फेब्रुवारीपासून सुरू झालेले शिवचरित्र पारायण १९ फेब्रुवारीपर्यंत सुरू राहणार आहे. मुलं अत्यंत तन्मयतेने या कथा ऐकत आहेत. १९ फेब्रुवारी रोजी सकाळी ढोल, ताशा, लेझीम च्या गजरात संपूर्ण गावातून राजांची मिरवणूक काढून शाळेमध्ये विविध कार्यक्रम घेतले जाणार आहेत.

विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पाडण्यासाठी असे विशेष उपक्रम सर्व जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांनी घ्यावे, असे आवाहन यानिमित्ताने शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी केले आहे.

शिवचरित्र पारायणावर आधारित प्रश्नमंजुषा, चित्रकला स्पर्धा घेतली आहे. तसेच शनिवारी पावनखिंड हा चित्रपट दाखविला. या शिवचरित्र पारायणाची चर्चा संपूर्ण महाराष्ट्रात सुरू आहे.

# उल्हासनगरमध्ये ड्रग्जसह दोघांना अटक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : रात्रीच्या वेळी साईबाबा मंदिराजवळ दोन युवक मोठ्या प्रमाणात एमडी ड्रग्जचा सौदा करणार असल्याची गोपनीय माहिती मिळताच मध्यवर्ती पोलीस आणि गुन्हे शाखेच्या पथकाने वॉच ठेवला. योग्य वेळी छापा टाकत पोलिसांनी तब्बल ५८.१ ग्रॅम एमडी ड्रग्जसह दोन आरोपींना अटक केली. जप्त करण्यात आलेल्या ड्रग्जची बाजारातील किंमत तब्बल ११ लाख ९४ हजार ५०० रुपये असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. 8 of 8 पोलीस हवालदार अमोल देसाई यांना माहिती मिळाली की, सोमवारी रात्री ११.३० वाजता उल्हासनगर-२ मधील साईबाबा मंदिराजवळ दोन युवक एमडी ड्रग्जचा सौदा करण्यासाठी येणार आहेत.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!
१ बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) कालावधी १ वर्ष
२ पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) कालावधी १ वर्ष
३ जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) कालावधी १ वर्ष
४ डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) कालावधी २ वर्ष
५ सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११२४) कालावधी ६ महिने
पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप WhatsApp Channels
संपर्क : + ९१ ९०८२६६४७८१
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतीक्षा रवींद्र घोडविंदे
www.jeevandeepvarta.com/
मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

# राजन साळवींच्या पक्ष प्रवेश ठाण्यात बॅनरबाजी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : राजापूरचे माजी आमदार राजन साळवी हे अवघ्या काही तासांत पक्ष प्रवेश करणार असल्याने टेंभीनाका येथील आनंद आश्रमाबाहेर भव्य व्यासपीठ उभारण्यात आले आहे. या व्यासपीठावरील फलकावर पक्षप्रवेश सोहळा असा उल्लेख करण्यात आला आहे. आनंद आश्रमात देखील साळवी यांच्या पक्ष प्रवेशाची तयारी सुरू झाली आहे.

राजापूरचे माजी आमदार राजन साळवी हे उद्धव ठाकरे यांच्या विश्वासू पदाधिकाऱ्यांपैकी एक होते. परंतु काही दिवसांपासून ते नाराज होते. मागील अनेक दिवसांपासून ते भाजप किंवा शिंदे गटात पक्ष प्रवेश करणार असल्याची चर्चा रंगत होती. अखेर बुधवारी त्यांनी ठाकरे गटाच्या उपनेते पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर त्यांनी शिंदे गटात प्रवेश करणार असल्याचे स्पष्ट केले. दुपारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या




हस्ते त्यांचा पक्ष प्रवेश होणार आहे. ठाण्यातील टेंभीनाका परिसरातील आनंद आश्रमात त्यांचा पक्ष प्रवेश पार पडणार आहे.

पक्ष प्रवेशासाठी टेंभीनाका बाहेरील पदपथावर व्यासपीठ उभारण्यात आले आहे. या व्यासपीठावरील मागील बाजूस बसविलेल्या फलकावर मोठ्या आकारात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे छायाचित्र आहे. फलकाच्या डाव्या बाजूस शिवसेना प्रमुख दिवंगत बाळासाहेब ठाकरे यांचे छायाचित्र आहे. तर उजव्या बाजूस शिवसेनेचे दिवंगत नेते आनंद दिघे यांचे छायाचित्र आहे. या फलकावर 'शिवसेना पक्षप्रवेश सोहळा' असा उल्लेख आहे. याच व्यासपीठावर माजी आमदार राजन साळवी यांचा पक्ष प्रवेश होणार आहे. त्यांच्यासह राजापूरमधील ठाकरे गटाचे काही पदाधिकारी आणि कार्यकर्तेही पक्ष प्रवेश करणार असल्याची माहिती शिंदे गटातील पदाधिकाऱ्यांनी दिली. आनंद आश्रमामध्येही पक्षप्रवेशासाठी जोरदार तयारी सुरू झाली आहे. शिंदे गटाचे ठाण्यातील पदाधिकारी आणि कार्यकर्ते आनंद आश्रमात जमण्यास सुरूवात झाली आहे. पक्ष प्रवेशापूर्वी राजन साळवी यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांची भेट घेतली. बुधवारी रात्री देखील शिंदे यांच्या निवासस्थानी साळवी गेले होते. तिथे एक बैठक झाल्याचे देखील कळते आहे.

राजन साळवी यांच्या शिंदे गटातील पक्ष प्रवेशामुळे ठाकरे गटाला कोकणात मोठा धक्का बसला आहे. एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांची साथ सोडल्यानंतर उद्धव ठाकरे यांच्याकडे काही मोजके आमदार होते. त्यापैकी राजन साळवी हे होते. परंतु त्यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची चौकशी सुरू आहे. त्यातच २०२४ मध्ये विधानसभा निवडणूकीत त्यांचा पराभव झाला होता. त्यानंतर ते आता शिंदे गटात प्रवेश करत आहेत.

# वन्य प्राण्याचा शेळ्यांवर हल्ला बारा शेळ्यांचा मृत्यू

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बोईसर :पालघर तालुक्यातील काटाळे येथे एका शेतकरयाच्या शेतातील गोठ्यात बांधून ठेवलेल्या शेळ्यांवर मध्यरात्रीच्या सुमारास अनोळखी वन्य प्राण्याने हल्ला केल्याची घटना घडली. अज्ञात वन्यप्राण्याने केलेल्या हल्ल्यात गोठ्यातील बारा शेळ्यांचा मृत्यू झाला असून पाच शेळया जखमी झाल्याने शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. शेळ्यांवर हल्ला करणारा वन्यप्राणी हा बिबट्या किंवा अन्य प्राणी असण्याची शक्यता असून यामुळे काटाळे परिसरातील नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून वनविभागाचे अधिकाऱ्यानी घटनास्थळी पोचून घटनेचा तपास सुरु केला आहे. पालघर तालुक्यातील मासवण नागझरी रस्त्यावरील काटाळे गावातील शेतकरी किरण पाटील यांची सूर्या नदीकिनारी शेती व वीटभट्टीचा व्यवसाय असून शेतीला जोडधंदा म्हणून त्यांनी शेळीपालनाचा व्यवसाय सुरु केला आहे. बागायती शेतीमध्ये त्यांच्या शेळयांचा गोठा असून मंगळवारी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात वन्यप्राण्याने गोठ्यातील शेळयांवर हल्ला केला. या हल्ल्यात बारा शेळयांचा मृत्यू झाला पाच शेळया जखमी झाल्या असून बुधवारी सकाळी ही घटना उघडकीस आली.

गोठ्याच्या परिसरात बिबट्या सदृश्य वन्य प्राण्याच्या पावलांचे ठसे आढळून आले असून मृत शेळयांची मान आणि शरीरावर चावा घेतल्याच्या खुणा देखील दिसून आल्या आहेत. डोंगररांगेतून सूर्या नदीचे पात्र ओलांडून बिबट्या आला असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. पालघर जिल्ह्याच्या जंगलांमध्ये अवैध वृक्षतोड, शिकार आणि वणवे यामुळे वन्यजीवांचे अस्तित्व धोक्यात आले

# ठाणे महापालिकेचे वृक्षवल्ली प्रदर्शन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे – नागरिकांना पर्यावरणाची आवड निर्माण व्हावी तसेच नागरिकांमध्ये पर्यावरणाविषयी जनजागृती व्हावी या उद्देशातून ठाणे महापालिकेमार्फत यंदाही वृक्षवल्ली प्रदर्शन भरविण्यात येणार आहे. यंदाचे प्रदर्शन हे 'जैवविविधतेचे सप्तरंग' या संकल्पनेवर आधारित असून या प्रदर्शनात सुमारे २०० प्रजातींची फुलझाडे, फळांची रोपटी, रंगीबेरंगी फुले, पाने असलेली झाडे, औषधी वनस्पती असे मिळून सुमारे ५ हजार रोपांचा समावेश असणार आहे.

ठाणे महानगरपालिकेचा उद्यान विभाग आणि वृक्षप्राधिकरण यांच्यातर्फे 'वृक्षवल्ली-२०२५' हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. शुक्रवार, १४ ते १६ फेब्रुवारी या काळात रेमंड कंपनीचे मैदान, पोखरण रोड येथे हे प्रदर्शन होत आहे. शुक्रवारी, १४ फेब्रुवारी रोजी दुपारी ३ वाजता या प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. 'वृक्षवल्ली' प्रदर्शनाचे यंदाचे १४ वे वर्ष आहे. दरवर्षी या प्रदर्शनाला सुमारे दीड ते दोन लाख नागरिक भेट देतात. यंदाचे प्रदर्शन हे 'जैवविविधतेचे सप्तरंग' या संकल्पनेवर आधारित असून या प्रदर्शनात सुमारे २०० प्रजातींची फुलझाडे, फळांची रोपटी, रंगीबेरंगी फुले व पाने असलेली झाडे, औषधी वनस्पती आदी मिळून सुमारे ५ हजार रोपांचा समावेश असणार आहे. या प्रदर्शनामध्ये कुंड्यांमधील शोभिवंत पानांची झाडे (झुडुपे), कुंड्यातील शोभिवंत फुलझाडे, वामन वृक्ष, आमरी (ऑर्कीडस्) कुंडीतील वृक्ष, हंगामी फुले, दांडीसह (कट फ्लॉवर) इतर असे एकूण ३० विभाग आणि पोटविभाग आहेत. तसेच, यावर्षी लाईव्ह नेचर पेंटींग, तज्ज्ञांच्या सहाय्याने वृक्षावर यंत्राच्या मदतीने रोहण करण्याचे प्रात्यक्षिक, हेरिटेज ट्री ट्रेल ही प्रमुख आकर्षणे

**प्रदर्शनामध्ये उद्यान विषयक वस्तूंच्या विक्रीसह बांबूपासून बनविलेल्या वस्तू, नैसर्गिक खतांचा वापर करुन उत्पादीत भाज्या, हायड्रोफोनिक्स तंत्रज्ञान आदी ४० दालनांचा समावेश आहे. 'वृक्षवल्ली-२०२५' प्रदर्शनाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ रविवार, १६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ होणार असल्याचे वरिष्ठ उद्यान अधिक्षक केदार पाटील यांनी सागितले.**

नागरिकांना अनुभवता येणार आहेत. या प्रदर्शनास भेट देताना नागरिकांनी प्लास्टिक बाटल्या, पिशव्या यांचा वापर टाळावा. तसेच, सोबत पाण्याच्या स्टिल किंवा काचेच्या बाटल्या आणाव्यात आणि खरेदीकरिता कागदी किंवा कापडी पिशव्या वापराव्यात, असे आवाहन ठाणे महापालिकेतर्फे करण्यात आले आहे.

या प्रदर्शनामध्ये रोटरी क्लब, इनरव्हिल क्लब, पर्यावरण दक्षता मंच, महाराष्ट्र निसर्ग उद्यान, माहिम यांच्यासह एमसीएचआय, हिरानंदानी समूह, अदानी समूह, लोढा समूह, रेमंड समूह अशा १५ खाजगी संस्था सहभागी झाल्या आहेत. तसेच स्थानिक ३० शाळांतील विद्यार्थ्यांनी चित्रकला व निसर्गाशी निगडीत देखावे साकारले आहेत. कट फ्लावर्स, पुष्परचनामध्ये ३० नागरिकांनी सहभाग घेतला आहे. यांच्यासह मध्य रेल्वे, एचपीसीएल या सरकारी संस्था ही प्रदर्शनात सहभागी झाल्या आहेत. एकूण सुमारे ९० संस्थांनी आकर्षक पुष्परचना, निसर्गाशी निगडीत देखावे, फुलपाखरांची छायाचित्रे यामधून नागरिकांच्या मनोरंजनासह ज्ञानात भर पाडणाऱ्या देखाव्यांची मेजवानी सादर केली असल्याची माहिती उपायुक्त (उद्यान) मधुकर बोडके यांनी दिली.

# नवी मुंबईत अनधिकृत बांधकामात वाढ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : नवी मुंबई महापालिका हद्दीत नव्याने उभ्या राहत असलेल्या बेकायदा बांधकामांविरोधात तातडीने कारवाई करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिले असतानाही महापालिकेच्या काही विभाग अधिकाऱ्यांकडून याकडे कानाडोळा केला जात असल्याचा प्रकार उघडकीस येत आहे. येथील गोठीवली भागात सिडकोच्या जागेवर बेकायदा इमारत बांधण्याचा प्रकार राजरोसपणे सुरू असताना त्याविरोधात महापालिकेकडे तक्रारी करणाऱ्या रहिवाशांना वाटाण्याच्या अक्षता दाखवल्या जात आहेत. विशेष म्हणजे रात्री अपरात्री या ठिकाणी वृक्षतोडीच्या घटनाही घडत आहेत.

नवी मुंबई पालिका हद्दीतील वाढत्या बेकयदा बांधकामांची दखल उच्च न्यायालयाकडून घेण्यात आली आहे. यासंदर्भात बेकायदा बांधकामांची काही छायाचित्रे याचिकाकर्त्यांनी न्यायालयात सादर केल्याने महापालिका प्रशासनाने मध्यंतरी कारवाईची मोहीम हाती घेतली होती. त्यानंतर सिडकोच्या अल्प उत्पन्न गटातील वसाहतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना



नोटिसा धाडण्याचे सत्रही पालिकेने सुरू केले होते. नव्या बांधकामांकडे कानाडोळा करत जुन्या बांधकामांमध्ये राहणाऱ्या रहिवाशांना नोटिसा बजावून त्यांना महापालिका कार्यालयामध्ये बोलावण धाडल्याचे प्रकारही उघडकीस येऊ लागले होते. मध्यंतरी महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांनी वाशी आणि कोपरखैरणे विभागातील प्रमुख अधिकाऱ्यांची बदली करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतरही इतर विभागांमध्ये काम करणारे अधिकारी शहाणे होण्यास तयार नाही.

गोठीवली येथील शंकर मंदिर रोड परिसरात एका अधिकृत इमारतीतील रहिवाशांच्या तक्रारीनंतरही लगतच सुरू असलेल्या बेकायदा बांधकामांकडे डोळेझाक केली जात असल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. गोठीवली येथील शंकर मंदिर रोड परिसरात सिडकोची जमीन आहे. परंतु गेल्याकाही दिवसांपासून सिडकोच्या जागेवर अनधिकृत बांधकाम होत असल्याचा आरोप येथील विघ्नहर्ता को-ऑपरेटिव्ह सोसायटी आणि शंकर अपार्टमेंटमेंटमधील रहिवाशांनी केला आहे. या अनधिकृत बांधकामासाठी येथे मोठ्या प्रमाणात बांधकाम साहित्य टाकण्यात आले आहे. येथील मोकळ्या जमिनीवर पूर्वी मोठ्याप्रमाणात वृक्ष होते. परंतु आता इमारत बांधली जात असल्याने रात्रीच्या वेळेत येथे अनेक वृक्षांची कत्तल सुरू करण्यात आल्याचा आरोपही रहिवाशांनी केला.

# सिडकोने थकविले व्हॅलीशिल्प सोसायटीचे नऊ कोटी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : खारघर उपनगरामधील सेक्टर ३६ येथील सिडकोच्या महत्त्वाकांक्षी 'व्हॅलीशिल्प' या उच्च उत्पन्न गटाच्या गृहनिर्माण सोसायटीतील विक्रीविना शिल्लक १४२ सदनिकांचे देखभाल-दुरुस्ती शुल्क सिडकोने थकविले आहे. याबाबत सोसायटीने सिडको मंडळाला पत्र लिहून सोसायटीमधील सिडकोच्या १४२ सदनिकांचे मार्च २०२१ ते डिसेंबर २०२४ या कालावधीचे मासिक देखभाल शुल्कापोटीचे थकीत असलेल्या ९ कोटी १४ लाख रुपयांची मागणी केली आहे. सिडकोच्या पणन विभागाने अद्याप




त्यावर कोणताही निर्णय घेतलेला नाही. दरम्यान, याच सोसायटीमधील मध्यम उत्पन्न गटातील ११८ घरांची आणि उच्च उत्पन्न गटातील १३६ घरांची सोडत मागील वर्षी सिडकोने जाहीर केली होती.

सिडको महामंडळाने आठ वर्षांपूर्वी खारघर उपनगरामधील सेक्टर ३६ येथे मध्यम आणि उच्च उत्पन्न गटासाठी १३०० घरांच्या 'व्हॅलीशिल्प' हा महत्त्वाकांक्षी महागृहनिर्माणाचा ताबा रहिवाशांना दिला. सिडकोने पहिल्यांदाच गृहनिर्माण प्रकल्पात व्यायामशाळा आणि क्लबहाऊस अशा सुविधा रहिवाशांना दिल्या होत्या. त्यामुळे सर्वत्र सिडकोच्या या सुविधांची चर्चा होती. मात्र आता याच गृहनिर्माणातील क्लबहाऊसची अवस्था ओसाड झाली आहे. दोन फुटापर्यंत येथे रान वाढले आहे.

सिडको मंडळाने मागील वर्षी 'व्हॅलीशिल्प' सोसायटीतील उच्च उत्पन्न गटाच्या श्रेणीतील एक हजार चौरस फुटाच्या घराची किंमत दोन कोटी ५५ लाख रुपये एवढी दर्शविली होती. व्हॅलीशिल्प सोसायटीत ही घरे आठ वर्षे विक्रीविना पडून असल्याने त्याचा भुर्दंड इतर सदनिकाधारकांवर पडला आहे. सोसायटीने सिडकोच्या नगर सेवा विभागाच्या व्यवस्थापकांना याविषयी ११ जानेवारीला पाठविलेल्या देयकाच्या मागणी पत्रामध्ये थकीत देखभाल शुल्क ६ कोटी २८ लाख रुपये आणि विलंब आकार शुल्क दोन कोटी ७० लाख रुपये आकारला आहे. तसेच इतरही सेवांविषयी शुल्क देयकात आकारले आहे. अद्याप सिडकोने व्हॅलीशिल्प सोसायटीच्या देयकाची दखल घेतली नाही.

# प्राण्यांवर अत्यंविधीसाठी मिरभाईदर मनपा उभारणार विद्युत दाहिन्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

भाईंदर :-मिरा भाईंदर शहरातील प्राण्यांवर अंत्यविधीची करण्यासाठी शहरातील दोन स्मशानभूमीत विद्युत दाहिन्याची उभारल्या जात आहेत. प्राण्यांच्या अंत्यविधीसाठी अशाप्रकारे विद्युतदाहिन्यांची सोय करून देणारी मिरा भाईंदर ही राज्याची पहिली महापालिका असल्याचा दावा केला जात आहे.

मिरा भाईंदर शहरात एकूण १६ स्मशानभूमी आहेत. यात अंत्यविधीसाठी पारंपरिक पध्दतीने लाकूड तसेच प्रदूषण रोखण्यासाठी गॅस आणि विद्युत दाहिनीची सोय प्रशासनाकडून उपलब्ध करून देण्यात आली आहे .याशिवाय अंत्यविधीसाठी तीन ठिकाणी दफनभूमी आहेत. परंतु शहरात प्राण्यांवर अंत्यविधी करण्यासाठी कोणतीच सुविधा उपलब्ध नव्हती. परिणामी एखादा प्राणी मृत पावल्यास त्याची दुर्गंधी संपूर्ण परिसरात पसरत असते. तर पाळीव प्राण्यांचा मृत्यू झाल्यास त्यावर अंत्यविधी कुठे करावा हा प्रश्न उद्भवत असतो. गेल्या वर्षीच मुंबई मधील एका पाळीव मांजराचा अंत्यविधी भाईंदरच्या स्मशान भूमीत करण्यात आल्याने मोठा वाद उभा राहिला होता. हे प्रकरण पेटल्यानंतर प्राण्यांच्या अंत्यविधीसाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध करणार असल्याची



घोषणा मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली होती. त्यानुसार या कामासाठी त्यांनी शासनाकडून निधी मंजुर करत प्राण्याच्या अंत्यविधी साठी विद्युत दाहीन्या खरेदी करण्याच्या सुचना पालिका प्रशासनाला दिल्या होत्या. पालिकेने निविदा प्रक्रिया राबवून या विद्युत दाहिन्यांची उभारणी करण्याचे काम हाती घेतले आहे. लवकरच या दाहीन्याच्या लोकार्पणाचा कार्यक्रम करून त्या वापरात आणणार असल्याची माहिती पालिकेच्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून देण्यात आली आहे.

दोन ठिकाणी विद्युत दाहिनी मिरा भाईंदर महापालिकेने प्राण्यांवर अंत्यविधी करण्यासाठी दोन विद्युत दाहिन्यांची खरेदी केली आहे. यात एक दाहीनी ही नवघर येथील एस.एन कॉलेज जवळ असलेल्या स्मशान भूमीत बसवण्यात आली असून दुसरी ही भाईंदर पश्चिमच्या मोरवा गावातील स्मशान भूमीत बसवली आहे.या दाहीन्याची किंमत जवळपास तीस लाख इतकी असून हा खर्च शासन निधीतुन करण्यात आला आहे.

# जाणीव संस्थेतर्फे मुलांसीठी समाजमाध्यम सतर्कता व्याख्याने

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वसई– ग्रामीण भागातील शाळकरी मुलींमध्ये इन्स्टाग्राम, स्नॅपचॅप आदी समाज माध्यमांचा वापर मोठ्या प्रमाणात होत असून त्यातून त्यांची फसवणूक आणि लैंगिक अत्याचार होत आहेत. पालघर पोलिसांनी जिल्ह्यातील १०० शाळांमध्ये राबिवलेल्या समुपदेशानातून ही बाब समोर आली आहे. शाळकरी मुलींची फसवणूक, लैंगिक अत्याचार होणे आदी प्रकारात वाढ झाली आहे. शाळकरी मुली अज्ञानामुळे प्रियकरासोबत मुली पळून जात आहेत. हे प्रकार रोखण्यासाठी तसेच मुलींमध्ये जागृती निर्माण व्हावी यासाठी पालघर पोलिसांनी जिल्ह्यातील शाळांमध्ये समुपदेशनासाठी व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले होते. ८ तालुक्यातील १०० शाळांध्ये जाणीव संस्थेतर्फे ७ वी ते १० वीच्या मुलांसीठी व्याख्याने आयोजित करण्यात आले होते. वयात येणाऱ्या मुलींना धोके कुठले? आकर्षणाला कसे बळी पडू नये? काय काळजी घ्यावी? लैंगिक छळापासून बचाव कसा करावा? आदीबाबत समुपदेशक मिलिंद पोंक्षे आणि गौरी संख्ये यांनी व्याख्याने दिली. या व्याख्यानानंतर संस्थेने अहवाल तयार केला आहे.

# अनधिकृत बांधकाम केडीएमसीकडून गुन्हे दाखल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली – डोंबिवली पूर्वेतील २७ गावांमधील गोळवली, दावडी येथे बेकायदा बांधकाम केल्याप्रकरणी कल्याण डोंबिवली पालिकेच्या आय प्रभागाच्या अधिकाऱ्यांनी एकूण पाच जणांच्या विरुध्द महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ३९७ (क) (एमआरटीपी) प्रमाणे मंगळवारी फौजदारी गुन्हे दाखल केले. या कारवाईने बेकायदा बांधकामधारकांमध्ये खळबळ उडाली आहे. वरिष्ठांच्या आदेशावरून आय प्रभागाचे साहाय्यक आयुक्त भारत पवार यांच्या मार्गदर्शनाखाली अधीक्षक शंकर नारायण जाधव यांच्या तक्रारीवरून मानपाडा पोलिसांनी हे गुन्हे दाखल केले आहेत.

अधीक्षक शंकर जाधव यांनी मानपाडा पोलीस ठाण्यातील तक्रारीत म्हटले आहे, की २७ गावातील मौजे गोळवली येथे सचिन शेलार, राम कुमकर आणि इतरांनी सात माळ्याची बेकायदा इमारत उभारल्याची तक्रार आय प्रभागात दाखल झाली होती. या तक्रारीच्या अनुषंगाने बांधकामधारकांना बांधकामांचा परवानगीची कागदपत्रे आय प्रभागात सादर करण्याच्या नोटिसा गेल्या

**गोळवली, दावडी येथील दोन्ही बांधकामधारकांनी बांधकामाची कागदपत्रे पालिकेला सादर केली नाहीत. ही बांधकाम अनधिकृत घोषित केल्यानंतरही ती स्वताहून तोडून घेतली नाहीत. त्यामुळे बांधकामधारकांवर फौजदारी गुन्हे दाखल केले आहेत. ही बांधकामे जमीनदोस्त करण्याचे नियोजन लवकरच केले जाईल.**

**- भारत पवार, साहाय्य आयुक्त, आय प्रभाग.**

महिन्यात दिल्या होत्या. बांधकामधारकांनी इमारत बांधकामाची कागदपत्रे सादर केली नाहीत. गेल्या आठवड्यात साहाय्यक आयुक्त भारत पवार यांनी शेलार, कुमकर यांचे सात माळ्याच्या इमारतीचे बांधकाम अनधिकृत घोषित करून हे बांधकाम स्वताहून तोडून घेण्याचे आदेश दिले होते. इमारत स्वताहून तोडून न घेतल्याने अधीक्षक जाधव यांच्या तक्रारीवरून बांधकामधारक शेलार, कुमकर आणि इतरांविरुध्द एमआरटीपीचा फौजदारी गुन्हा मानपाडा पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला.

दुसऱ्या एका प्रकरणात, मौजे दावडी येथे ऐश्वर्या बंगल्याच्या बाजुला घर मालक चंदन कुर्मी, विनोद बुरई, कैलास सिंग यांनी मूळ घरावरील पत्रे काढून ऐश्वर्या बंगल्याला खेटून आर. सी. सी. पध्दतीने दोन वर्षापूर्वी बेकायदा बांधकाम केले. या विषयीच्या तक्रारी प्राप्त होताच घर मालक चंदन कुर्मी आणि इतरांना या बांधकामाच्या परवानगीची कागदपत्रे सादर करण्याची नोटीस तत्कालीन अधिकाऱ्यांनी बजावली होती. घर मालक कुर्मी यांनी बांधकामाची कागदपत्रे पालिकेत सादर केली नाहीत. सुनावणीलाही ते हजर राहिले नाहीत. साहाय्यक आयुक्त पवार यांनी कुर्मी यांचे बांधकाम अनधिकृत घोषित करून ते स्वताहून पाडून घेण्याची नोटीस घरमालकाला बजावली होती. बांधकाम पाडून न घेतल्याने अधीक्षक जाधव यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी घरमालक चंदन यांच्यासह विनोद, कैलास यांच्यावर एमआरटीपीचा गुन्हा दाखल केला. साहाय्यक आयुक्त पवार यांनी प्रभागातील बेकायदा बांधकामांच्या विरुध्द एमआरटीपीचे गुन्हे दाखल करून ती बांधकामे पालिकेच्या अभिलेखावर आणून पाडकामाचे नियोजन केले आहे.

# वाशी बाजार समितीत द्राक्षांची आवक वाढली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : वाशी मुंबई कृषी उत्पन्न बाजारात समितीत नोव्हेंबर महिन्यात द्राक्ष दाखल होण्यास सुरुवात होते. तसेच जानेवारी मध्ये द्राक्षांचे प्रमाण अधिक वाढते. साधारण १५ नोव्हेंम्बर नंतर द्राक्षची आवक सुरू होत असून १५ एप्रिलपर्यंत हंगाम सुरू असतो. परंतु यंदा पाऊस लांबल्याने द्राक्षांच्या बागांची छाटणी एक महिना उशिराने सुरू झाली. त्यामुळे यंदा हंगाम सुरू होण्यास विलंब झाला आहे. सुरुवातीला बाजारात आवक तुरळक होती, शिवाय दाखल होणारे द्राक्ष चवीला आंबट होते. त्यामुळे ग्राहक गोड द्राक्षांच्या प्रतीक्षेत होते.

# चिर्ले – दिघोडे मार्ग अजूनही खड्ड्यात सार्वजनिक बांधकाम विभागाचे दुर्लक्ष

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उरण : चिर्ले ते दिघोडे मार्गावर कंटेनर वाहतुकीमुळे तीन ते चार फूट खोलीचे मोठमोठे खड्डे पडले आहेत. या खड्डयांमुळे या मार्गावरून दररोज जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे. जेएनपीटी बंदरावर आधारित अनेक गोदामे चिर्ले, दिघोडे, वैश्वी, जांभूळपाडा, दादरपाडा या गावांमध्ये आहेत. त्यामुळे हा परिसर कंटेनरच्या गोदामांचे गाव म्हणून ओळखला जात आहे. या मार्गावरून दिवसरात्र हजारो कंटेनर वाहने ये-जा करीत आहेत. हा मार्ग रानसई धरणासाठी एमआयडीसीकडून तयार करण्यात आला होता. त्यानंतर सध्या हा मार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आहे. हा दास्तान ते दिघोडे मार्ग होता. यातील दास्तान ते चिर्ले मार्गावर नव्याने उड्डाणपूल उभारण्यात आला आहे. तर चिर्ले ते दिघोडे मार्गावरील वाढत्या वाहनांमुळे प्रचंड खड्डे पडले आहेत. हे खड्डे बुजविण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची आहे.

**या मार्गाच्या दुरुस्तीचा प्रस्ताव असून तो अनेक वर्षे बासनात गुंडाळला गेला आहे. याचा त्रास येथील नागरिकांना सहन करावा लागत आहे. चिर्ले ते दिघोडे मार्गावरून प्रवास करीत असताना धूळ, माती आणि खड्ड्यांचा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या मार्गाची लवकरात लवकर दुरुस्ती करावी.**

**- विवेक पाटील, नियमित प्रवासी**

**कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण**

**मालमत्ता विभाग**

**जाहिर निविदा सूचना क्र. १०, सन २०२४-२५**

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७९ अन्वयेच्या तरतुदीनुसार कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या ताब्यातील प्राथमिक शाळा या आरक्षणाची मालमत्ता ३० वर्ष कालावधीसाठी भाडेतत्वावर देणेबाबत.

१) निविदा विक्री दि. १४/०२/२०२५ ते ०५/०३/२०२५ रोजी वेळ दुपारी ३.०० वाजेपर्यंत राहील.
२) निविदा स्विकृती दि. १४/०२/२०२५ ते दि. ०५/०३/२०२५ रोजी वेळ दुपारी ३.०० वाजेपर्यंत राहील.
३) निविदा पूर्व बैठक दि. २५/०२/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. अतिरिक्त आयुक्त -२, कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या दालनात घेतली जाईल.
४) शक्य झाल्यास दि. ०६/०३/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता ई- टेंडरींग विभाग, नागरिक सुविधा केंद्र, येथे उघड्यात येईल.
५) ही निविदा महापालिकेच्या WWW.Mahatenders.gov.in या वेबसाईटवरुन विक्री व स्विकृती करता येतील.

सर्व निविदा किंवा कोणत्याही निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार मा. आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण यांनी राखुन ठेवला आहे.

सही/-
उप आयुक्त (मालमत्ता)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका,
कल्याण

*जावक क्रमांक : कडोंमप/जसंवि/मुका/१७० दिनांक : १३/०२/२०२५

# बाजारात द्राक्षे दाखल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

नवी मुंबई : वाशी मुंबई कृषी उत्पन्न बाजारात समितीत डिसेंबर-जानेवारीपासून तुरळक प्रमाणात द्राक्षे दाखल होण्यास सुरुवात झाली होती. परंतु ती द्राक्षे चवीला आंबट होती. आता उष्णता वाढायला सुरुवात झाल्याने गोड द्राक्षे बाजारात दाखल होण्यास सुरुवात झालेली आहे.नोव्हेंबर महिन्यात द्राक्ष दाखल होण्यास सुरुवात होते. तसेच जानेवारी मध्ये द्राक्षांचे प्रमाण अधिक वाढते.साधारण १५ नोव्हेंबर नंतर द्राक्षची आवक सुरू होत असून १५ एप्रिलपर्यत हंगाम सुरू असतो. परंतु यंदा पाऊस लांबल्याने द्राक्षांच्या बागांची छाटणी एक महिना उशिराने सुरू झाली. त्यामुळे यंदा हंगाम सुरू होण्यास विलंब झाला आहे. सुरुवातीला बाजारात आवक तुरळक होती, शिवाय दाखल होणारे द्राक्ष चवीला आंबट होते. त्यामुळे ग्राहक गोड द्राक्षांच्या प्रतीक्षेत होते. परंतु ग्राहकांची प्रतीक्षा संपली असून बाजारात आता गोड द्राक्षांच्या हंगामाला सुरुवात झाली आहे. बाजारात आधी २-३ गाडी दाखल होत असत. आता ९-१० गाड्या दाखल होत असून बुधवारी बाजारात ७०० क्विंटल द्राक्षे दाखल झाली आहेत. सध्या द्राक्षाच्या बागेला पोषक अशा उष्ण वातावरणाची निर्मिती सुरू झाली आहे. या उष्णतेमुळे फळामध्ये गोड रस निर्माण होण्यास सुरुवात झालेली आहे. घाऊक बाजारात सफेद द्राक्षांच्या ९-१० किलो पेटीला ५०० ते ९०० रुपये बाजारभाव आहे. मार्चमध्ये मोठ्या प्रमाणावर द्राक्ष दाखल होण्यास सुरुवात होईल, तसेच १५ एप्रिलपर्यंत द्राक्षांचा हंगाम सुरू राहील असे मत व्यापाऱ्यांनी व्यक्त केले आहे.

## संक्षिप्त

### आदिवासी विकासमंत्र्यांनी विद्यार्थ्यांशी साधला संवाद

**शाळेतील अडचणी घेतल्या समजून**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूरः आदिवासी विकास प्रकल्प शहापूर अंतर्गत नुकताच संवाद चिमुकल्यांशी अभियान पार पडले. आदिवासी विकास मंत्री अशोक ऊईके यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमांतर्गत आदिवासी विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनातील अडचणी, त्यांच्या सुरक्षिततेची हमी, उपलब्ध सुविधांची गुणवत्ता याबाबत माहिती मिळवून अभियानाची सुरुवात करण्यात आली. तालुक्यातील शिरोळ, सुसरवाडी, माळ, अघई तसेच आदिवासी विकास विभागामधील कार्यरत अधिकारी, कर्मचारी, प्रकल्प अधिकारी राजेंद्रकुमार हिवाळे यांच्या मार्गदर्शनाखाली शासकीय आश्रमशाळा आणि वसतिगृहांमध्ये पोहोचत विशेष पाहणी करून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. प्रकल्प अधिकारी हिवाळे यांनी शिरोळ आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या विविध कलागुणांच्या गुणवत्तेसंबंधी प्रत्यक्ष संवाद साधत त्यांच्यातील क्षमता जाणून सुप्त कलागुणांना वाव देऊन क्षमता वाढविणे आवश्यक असल्याची जाणीव करून दिली. यावेळी कलाक्षेत्रात प्रावीण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच आदिवासी विकास मंत्री अशोक ऊईके यांनी व्हीसीद्वारे थेट विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी अघई, सुसरवाडी, माळ, शिरोळ आश्रमशाळा मुख्याध्यापक अनुक्रमे अनंता विशे, मंगल ठाकरे, अंकुश आरे यांनी उपक्रम राबवला. या उपक्रमाला शालेय कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला.

### केडीएमसी उपआयुक्तांनी केली महाविद्यालयांची पाहणी



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : इयत्ता १२ वीची परिक्षा राज्यभर सर्वत्र सुरु झाली आहे. या १२ वीच्या परिक्षेच्या पार्श्वभुमीवर परिक्षेत होणाऱ्या कॉपीवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीकोनातून शिक्षण विभागाचे उपायुक्त संजय जाधव, शिक्षण विस्तार अधिकारी मारुती जाधव, माधुरी आयनोर, सहा. कार्यक्रम अधिकारी अर्चना जाधव यांच्या पथकाने कल्याण पश्चिम येथील लुड्स हायस्कुल, नॅशनल ऊर्दु जुनिअर कॉलेज, मोहिंदर सिंग काबुल सिंग जुनिअर कॉलेज, सेंट झेविअर जुनिअर कॉलेज, बिर्ला महाविद्यालय या महाविद्यालयांना परिक्षा कालावधीत समक्ष भेट देऊन संबंधित महाविदयालयातील प्राचार्यांशी चर्चा केली.

१२ वीच्या परिक्षा कालावधीत कल्याण डोंबिवली महापालिका क्षेत्रात १२ वीच्या परिक्षांचे केंद्र असलेल्या महाविदयालयांची फिरत्या पथकामार्फत सातत्याने पाहणी केली जाईल, अशी माहिती शिक्षण विभागाचे उपायुक्त संजय जाधव यांनी दिली.

### शिक्षण विभागाकडून ५२ शिक्षकांना पदोन्नतीचा लाभ

ठाणे : जिल्हा परिषद ठाणे अंतर्गत शिक्षण विभागातील विस्तार अधिकारी (शिक्षण) वर्ग ३ श्रेणी ३ या पदासाठी केंद्रप्रमुख / मुख्याध्यापक / शिक्षक संवर्गातून ११ पात्र शिक्षकांना पदोन्नती देण्यात आली व मुख्याध्यापक पदावर ४१ पात्र शिक्षकांना पदोन्नती देण्यात आली. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या विशेष मार्गदर्शनाखाली पदोन्नती देण्यात आली आहे.शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे, अधीक्षक सारासे श्री. बी. ए. गोमासे, विस्तार अधिकारी (शिक्षण) आशिष झुंजारराव तसेच शिक्षण विभागातील सहाय्यक प्रशासन अधिकारी, कनिष्ठ प्रशासन अधिकारी व कर्मचारी यांनी यासाठी प्रयत्न केले. या कार्यक्रमात शिक्षक व शिक्षण विभागातील अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षकांना दिल्या जाणाऱ्या विविध लाभाबाबत विशेष पाठपुरावा वेळोवेळी मुख्य कार्यकारी अधिकारी घेत असल्याने शिक्षण विभागातील ५२ शिक्षकांना पदोन्नतीचा लाभ देण्यात आला आहे. याबाबत संबंधित शिक्षक व शिक्षक संघटना यांनी समाधान व्यक्त केले. तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे व शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांचे आभार व्यक्त केले आहेत.

# उबाठा गटाच्या वतीने मलंगमुक्तीसाठी आंदोलन



### आनंद दिघेंना गुरू मानता तर मग मलंगगडाला मुक्ती का नाही दिली...?

**शिवसेना उपनेते विजय साळवी यांचा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सवाल**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : आनंद दिघेंना गुरू मानता, त्यांच्या आशीर्वादाने सत्तेत सहभागी झालात तर मग मलंगगडाला मुक्ती का नाही दिली असा परखड सवाल शिवसेना उपनेते विजय साळवी यांनी उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेणे एकनाथ शिंदे यांना केला आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने माघ पौर्णिमेचे औचित्य साधून मलंगमुक्तीसाठी आंदोलन करत मलंगगडावर आरती करण्यात आली. यावेळी शिवसेना उपनेते विजय साळवी यांनी प्रसिद्धी माध्यमांशी संवाद साधला.

मलंग मुक्ती आंदोलन पहिल्यांदा आनंद दिघे यांनी सुरू केले. सत्यपाल मालनी यांनी सुचविल्या नंतर पुण्याच्या गोखले यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन सुरू झाले. या आंदोलनासाठी आनंद दिघे यांनी प्रचंड यातना पोलिसांचे अनेक अत्याचार सहन केले. या आंदोलनासाठी दिघे यांनी कारवास भोगला या आंदोलनासाठी जीवाचे रान केले. पण स्वतः ला त्यांचे शिष्य म्हणवतात. त्यांचे नावे पिक्चर काढतात आणि आपली राजकीय पोळी भाजतात, त्यांनी या आंदोलनाला काय न्याय दिला. मंलग मुक्ती त्यांनी का केली नाही. दिघे यांना गुरू मानतात, गुरूच्या अशिवार्दाने सत्तेत सहभागी झालात, मंत्री झालात मुख्यमंत्री झालात, मग का मंलग मुक्ती केली नाही असा सवाल साळवी यांनी केला.

मंलगगड वक्फ बोर्डाकडे का वर्ग झाला. आजच आम्ही रस्त्यावर आंदोलन करायच का, तुम्हाला सत्तेत कोणी बसवल, जी दिघे साहेबांची इच्छा होती. ती पूर्ण करायची जबाबदारी तुमची नव्हती का, स्वतः दुकाने थाटून हे आंदोलन तुम्ही करताय, तुम्ही सत्तेत आहात, आम्ही त्याचा जाहीर निषेध करतो अशी टीका विजय साळवी यांनी केली. यावेळी मोठया संख्येने उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

# केडीएमसीत सफाई कामगारांच्या वारसांची पात्रतेनुसार नियुक्ती



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : शासन निर्यणाची केडीएमसीने अमंलबजावणी करीत सफाई कामगारांच्या अनुसूचित प्रवर्गातील 66 पात्र वारस उमेदवारांना शैक्षणिक अर्हतेनुसार महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.

पात्र उमेदवारांना शैक्षणिक महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, यांच्याकडील पत्र क्रमांक – न्यायाप्र२०२३/प्र.क्र.४८/सआक, दिनांक १२ जुलै २०२४ च्या आदेशान्वये उच्च न्यायालयाच्या आदेशात वाल्मिकी मेहत्तर व रुखी या जाती प्रवर्गातील सफाई कामगारांच्या सोबत अनुसुचित जाती व नव बौध्द प्रवर्गातील सफाई कामगारांच्या पात्र वारसांना वारसा हक्काने नियुक्ती देण्यापासून सूट देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने अनुसुचीत प्रवर्गातील ६६ पात्र उमेदवारांना शैक्षणिक अर्हतेनुसार महापालिका आयुक्त डॉ. इंदु राणी जाखड़ यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले.

या ६६ उमेदवारांपैकी १२ उमेदवारांना "लिपीक टंकलेखक" पदावर, ११ उमेदवारांना "शिपाई" पदी व उर्वरीत ४३ उमेदवारांना "सफाई कामगार" पदावर नियुक्ती देण्यात आली असल्याने या उमेदवारांचा आनंद व्दिगुणीत झालेला दिसून आला.

# जलयुक्त शिवार अभियानातून महाराष्ट्र जलक्रांतीच्या दिशेने

**– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



मुंबई : राज्यात जलसंधारण विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेले जलयुक्त शिवार अभियान हे महत्वाकांक्षी अभियान असून. या अभियानाच्या माध्यमातून राज्यात लोकसहभागातून झालेली कामे ही जलक्रांतीच्या दिशेने पडलेले पाऊल आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

मृद व जलसंधारण विभाग अंतर्गत आयोजित जलसंधारण अधिकारी गट ब (अराजपत्रित) नियुक्ती पत्राचे (रिमोटद्वारे ऑन लाईन पदध्दतीने ) वितरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते करण्यात आले. तर प्रातिनिधीक स्वरुपात सहा उमेदवारांना प्रत्यक्ष नियुक्ती आदेशाचे वितरण करण्यात आले.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथील सभागृहात झालेल्या या समारंभास मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव गणेश पाटील, आयुक्त प्रकाश खपले यांच्यासह नवनियुक्त अधिकारी व त्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

जलसंधारण विभागामध्ये निवड झालेल्या या 601 अधिकाऱ्यांचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, जलसंधारण विभाग हा शेतकऱ्यांच्या जीवनामध्ये परिवर्तन घडवणारा विभाग आहे. या विभागाच्या परिवारामध्ये नवनियुक्त अधिकाऱ्यांनी सामान्य माणूस व शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविण्याचे ध्येय बाळगावे. शासनाच्या माध्यमातून सामान्यांची सेवा करण्याची आपणास संधी मिळाली आहे. या संधीचे सोनं करून जनसामान्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलवावे. राज्यात 75 हजार हजार नोकर भरती करण्यास सुरुवात केली. प्रत्यक्षात 1 लाख 50 हजार नोकर भरती होत असल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यातील ग्रामीण भागात पाणीटंचाई दूर करून शाश्वत शेतीसाठी पाण्याची उपलब्धता निर्माण करणे हा जलयुक्त शिवार अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या अभियानाच्या माध्यमातून राज्यातील गावे जलयुक्त झाली असून भूजल पातळीत वाढ झाली आहे. शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी उपलब्ध झाले, ज्यामुळे पीक उत्पादनात वाढ झाली. भूजल पातळीत वाढ झाल्याने शेतकऱ्यांना दोन्ही हंगामात पीक घेता येऊ लागली हे या अभियानाचे यश आहे.

जलयुक्त शिवार योजना राज्याच्या जलसंधारणासाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरली. या योजनेच्या कामांमुळे देशात महाराष्ट्रात भूजल पातळी वाढ झाल्याचे केंद्र शासन व उच्च न्यायालयानेही त्यांच्या अहवालात मान्य केले आहे. भविष्यात ही योजना अधिक काटेकोरपणे, नियोजनबद्ध तंत्रज्ञानाधारित आणि स्थानिक सहभाग घेऊन अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणारे असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

मृद व जलसंधारण मंत्री राठोड म्हणाले, मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून राज्यात सुरू झालेल्या जलयुक्त शिवार अभियानाने क्रांती घडवून आणली. शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावणे हा जलयुक्त शिवार अभियानाचा मुख्य उद्देश असून या अभियानात मिळालेला लोकसहभाग हे या अभियानाचे यश असल्याचे श्री. राठोड यांनी सांगितले. नवनियुक्त अधिकाऱ्यांमुळे जलसंधारण विभागातील कामांना अधिक गती मिळेल असा विश्वास श्री. राठोड यांनी व्यक्त केला. जलसंधारण विभागाने अत्यंत पारदर्शक पद्धतीने ही भरती प्रक्रिया पूर्ण केली. नवनियुक्त अधिकाऱ्यांनी जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी काम करावे, असे आवाहन त्यांनी केले.मृद व जलसंधारण राज्यमंत्री श्री. नाईक म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनाखाली जलयुक्त शिवार अभियानात देशात आदर्शवत असे काम झाले आहे. जलसंधारण विभागामध्ये नवनियुक्त अधिकाऱ्यांनी लोकांच्या जीवनात परिवर्तन घडवण्यासाठी काम करण्यासाठी कटिबद्ध राहण्याचे श्री. नाईक आवाहन केले.

सचिव गणेश पाटील यांनी प्रास्ताविक केले तर आभार आयुक्त प्रकाश खपले यांनी मानले.

# समाजात संवाद खुंटत चाललाय

**- बबन सरवदे**




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : गौतम बुद्धांनी सांगितल्या प्रमाणे जगातील सर्वात मोठी गोष्ट संवाद आहे. समाजात व्यक्त होणं ही भावना कमी होत चालल्याने आज वाद विकोपाला जाताहेत. एक सुसमाज घडण्यासाठी आपसात संवाद घडायला हवा, जो झपाट्याने खुंटत चाललाय. अशी चिंता जेष्ठ आंबेडकरी कवी बबन सरवदे यांनी व्यक्त केली. सुभाष टेकडी परिसरात मानवता अभियान सामाजिक संस्था आणि दिवंगत कवी अनिल भालेराव विचार मंच आयोजित रमाई जयंती महोत्सवात ते बोलत होते.

रमाई ही त्यागा पेक्षा अधिक लढाऊ होती. आणि ती एकटीच लढली, ज्या दिवशी तसं लढण्याची हिंमत आजच्या महिलांमध्ये जागृत होईल तेव्हा खरी महिला सक्षमी करणाची क्रांती होईल. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी रमाईचे कष्ट व दुःख खुप जवळुन पाहिल्या मुळेच बाबासाहेबांनी स्त्रियांना हक्क अधिकार बहाल करू शकले. असेही ते पुढे म्हणाले.यावेळी बांभोरी गावाचे सरपंच सचिन बिऱ्हाडे, योगिता चौधरी, ॲड जय गायकवाड व ॲड पायल गायकवाड यांना त्यांच्या विशेष कामगिरी बद्दल जिजाऊ साऊ पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. या कार्यक्रमाच्या स्वागताध्यक्षपदी वंचित बहुजन आघाडीचे प्रवक्ते प्राध्यापक सुरेश सोनवणे होते तर अध्यक्षपदी मानवता अभियानाच्या अध्यक्षा निवेदिता जाधव या होत्या.

यावेळी आयोजित कवी संमेलनात उठाव चे अध्यक्ष कवी विवेक मोरे, महाकवी वामनदादा कर्डक यांचे नातु कवी संदेश शालिनी संभाजी कर्डक, कवी सुदेश जगताप, गझलकार गजानन गावंडे, प्रफुल्लता मोहोड, सोपान नगराळे विकास जाधव आदिंनी कविता सादर केल्या. तसेच डॉ सम्यक भालेराव , प्रशांत पवार, माजी नगरसेवक राजेश वानखेडे, शांताराम निकम, सामाजिक कार्यकर्ता शशिकांत दायमा, कवयित्री अनुराधा वानखेडे,

आतिश जाधव, सुमेध दाभाडे, अशोक निकम, कवी डॉ अशोक वानखेडे, कॅप्टन भीमराव इंगळे, जयभीम स्तंभ महीला मंडळ, मानवता अभियान समर्थक व विभागातील शेकडो नागरीक उपस्थित होते.

# बालकांची खरेदी विक्री करणे तसेच बेकायदेशीररित्या बाळाला दत्तक देणे कायद्याने गुन्हा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, ठाणे येथे दि.31 जानेवारी 2025 रोजी 181 या हेल्पलाईनद्वारे उल्हासनगर येथे राहणाऱ्या महिलेची कौटुंबिक वादाची माहिती प्राप्त झाली. ही माहिती प्राप्त होताच उल्हासनगर येथील सखी केंद्र 1 यांच्याकडून त्वरित महिलेला संपर्क साधण्यात आला व तिला उल्हासनगर येथील महिला व बाल विकास विभागाच्या सखी केंद्राच्या कार्यालयात बोलावून घेण्यात आले. पिडीत महिलेने दिलेल्या माहितीवरुन ती अविवाहिता असून लीव्ह इन रिलेशनशिप मध्ये एका पुरुषासोबत राहत होती. परंतू गेल्या काही महिन्यांपासून त्यांच्यामध्ये वाद होत असल्याने ती पीडित महिला तिच्या आईसोबत उल्हासनगर येथे राहत होती. पीडिता ही गरोदर असताना त्याने होणाऱ्या बाळाचे पालकत्व स्वीकारण्यास परवानगी दिली होती, परंतु बाळाचा जन्म झाल्यानंतर मात्र आपली आर्थिक परीस्थिती खराब असून आपण त्या बाळाला सांभाळू शकत नसल्याने ते बाळ एका गरजू कुटुंबाला देण्याचे दोन्ही जैविक पालकांनी ठरवले. त्यानुसार ते बाळ कळवा येथील एका महिलेला देण्यात आले व तसे पेपर तयार केले. पीडित महिलेने दिलेल्या तोंडी माहितीनुसार त्या बाळाबद्दल 10 हजार रुपये तिला दिले असून पेपरवर त्याचा काही उल्लेख न केल्याचे तिने सांगितले. सखी केंद्राला बाळाच्या खरेदी विक्री झाल्याबद्दल लक्षात येताच महिला बाल विकास विभागाअंतर्गत येणाऱ्या जिल्हा बाल संरक्षण कक्ष, ठाणे यांना झालेल्या प्रकाराची माहिती दिली. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात येताच जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी ठाणे यांच्या आदेशानुसार संबंधित कक्षाच्या कर्मचाऱ्यानी कळवा पोलिस स्टेशन गाठले. कळवा पोलिसांच्या मदतीने 31 जानेवारी 2025 रोजी रात्री कळवा येथील झोपडपट्टीत या बाळाचा शोध घेवून त्या बालकाला रात्री 12.30 वाजताच्या सुमारास ताब्यात घेतले. बाळाची परीस्थिती ठीक नाही हे लक्षात येताच ठाणे बाल कल्याण समिती यांच्या आदेशान्वये बाळाला उपचाराकरीता छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, कळवा येथे दाखल करण्यात आले. दवाखान्यातून बाळाला डिस्चार्ज मिळाल्यानंतर बाल कल्याण समिती समोर हजर करून त्यास जननी आशिष दत्तक संस्था, डोंबिवली येथे दाखल करण्यात आले आहे.

ठाणे बाल कल्याण समिती यांनी दिलेल्या आदेशानुसार दि.12.02.2025 रोजी बालकाचे जैविक पालक तसेच बेकायदेशीर दत्तक पालक यांच्यावर विठ्ठलवाडी पोलिस ठाण्यात संबधित प्रकरणाविरोधात बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम 2015 अन्वये कलम 80, 81 नुसार गुन्हा क्र.0105/2025 नोंद करण्यात आलेला आहे.

बालकांची खरेदी विक्री करणे तसेच बेकायदेशीररित्या बाळाला दत्तक देणे हा कायद्याने गुन्हा आहे. जर पालकांना बाळ दत्तक घ्यायचे असेल तर त्यांनी cara.gov.wcd.in या संकेतस्थळावर जाऊन तेथे नोंद करणे आवश्यक आहे व ही प्रक्रिया कायदेशीर दत्तक प्रक्रिया आहे. तसेच मदतीसाठी हेल्पलाईन क्रमांक 1098 येथे अथवा जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, ठाणे येथे संपर्क साधावा, असे आवाहन ठाणे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संतोष भोसले यांनी केले आहे.

# संत शिरोमणी रोहिदास महाराज चौकाचे नूतनीकरण




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे प्रथम स्थायी समिती सभापती कै. चंद्रकांत भोईर यांनी साकारलेल्या संत शिरोमणी रोहिदास महाराज चौकाचे नुतनीकरण महानगरपालिकेच्या समाज कल्याण विभागा तर्फे करण्यात आले. या चौकाचे नुतनीकरण केल्यानंतर बुधवारी संत शिरोमणी रोहिदास महाराज यांची जयंती थाटात साजरी करण्यात आली.

कल्याण पश्चिमेत गुरूदेव हॉटेल शेजारी असलेल्या चौकात महानगरपालिकेचे प्रथम स्थायी समिती सभापती चंद्रकांत भोईर यांनी संत शिरोमणी रोहिदास महाराज चौकाची संकल्पना करून चौकाचे नामकरण केले होते. त्यानंतर या चौकात प्रत्येक वर्षी संत शिरोमणी रोहिदास महाराजांची जयंती साजरी करण्यात येत होती. चर्मकार समाजाचे लोकांनी नंतर पुढाकार घेऊन चौकाचे नुतनीकरण करण्यासाठी महानगरपालिकेच्या समाज कल्याण विभागा कडे पाठपुरावा केला. त्यानंतर चौकाचे नुतनीकरण करण्यात आले. बुधवारी या चौकात जयंती साजरी करण्यात आली आणि ज्यांच्या संकल्पनेतून चौक बांधला गेला त्या कै. चंद्रकांत भोईर यांचे सुपुत्र रूपेश भोईर यांनी नारळ फोडून नूतनीकरण झालेल्या चौकाचे उद्घाटन केले. यावेळी कल्याणचे सहाय्यक पोलीस आयुक्त कल्याणजी घेटे, बाळा परब, रवि पाटिल, अरविंद मोरे, समृद्ध ताडमारे, निलेश भोर यांच्यासह संत रोहिदास ज्ञाती समाजाचे अध्यक्ष महेश भोईर आणि चर्मकार समाजाचे इतर लोक उपस्थित होते.

# भाजप सदस्य नोंदणीत उल्हासनगर अव्वल

उल्हासनगर : संपूर्ण महाराष्ट्रात भारतीय जनता पक्षाच्या प्राथमिक सदस्य नोंदणी मोहिमेने जोर पकडला असताना, उल्हासनगर भाजपने ऐतिहासिक कामगिरी करून पहिला क्रमांक पटकावला आहे. पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने ठरवलेल्या ५२ हजार सदस्यांच्या उदिष्टला उल्हासनगर भाजपने वेळेपूर्वीच गाठत, संपूर्ण राज्यात एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. संगठन, समर्पण आणि सततच्या प्रयत्नांमुळेच हा अभूतपूर्व विक्रम शक्य झाला आहे. भाजप आमदार कुमार आवलानी आणि भाजप जिल्हाध्यक्ष प्रदीप रामचंदानी यांच्या नेतृत्वाखाली पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेत, पक्ष संघटनेचे बळ वाढवण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. भाजपच्या राज्यस्तरीय सदस्य नोंदणी मोहिमेत जिल्ह्यासाठी ५२ हजार सदस्यांचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले होते. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी सुरुवातीपासूनच ठोस नियोजन आखण्यात आले. सर्व पदाधिकाऱ्यांना विशिष्ट जबाबदाऱ्या देण्यात आल्या आणि प्रत्येक कार्यकल्याने जोमाने काम करत सदस्य संख्येत मोठी भर टाकली. या मोहिमेत उल्हासनगर भाजपने महाराष्ट्रात सर्वांत प्रथम १०० टक्के लक्ष्य गाजून इतिहास रचला. रविवारी हा मोठा टप्पा पूर्ण झाल्यानंतर, कार्यकत्यांमध्ये प्रचंड उत्सा पाहायला मिळाला. मात्र, जेव्हा हे स्पष्ट झाले की संपूर्ण महाराष्ट्रात उल्हासनगर संपूर्ण महाराष्ट्रात उल्हासनगर भाजपने पहिल्या क्रमांकावर झेप घेतली आहे, तेव्हा आनंद द्विगुणित झाला. या ऐतिहासिक विजयावर आमदार कुमार आयलानी यांनी पक्षाच्या प्रत्येक कार्यकत्यांचे आणि पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले. संपूर्ण महाराष्ट्रात उल्हासनगरने बाजी मारली, ही आमच्या कार्यकत्यांच्या मेहनतीची साक्ष आहे. या यशाने भाजपच्या संघटनेला आणखी बळ मिळेल. भविष्यातही पक्षवाढीचा हा प्रवास असाच अविरत सुरू राहील, असे आमदार कुमार आयलानी यांनी सांगितले.

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024